# शाहू महाराजांच्या गोष्टी

## 1. रसिक राजा-घरंदाज कलावंत

मोठमोठे गायक, कलाकार, नट, वादक, मल्ल आपल्या संस्थानात असावेत असे शाहू महाराजांना नेहमी वाटे. ते तसा प्रयत्न करत. कलाकारांना उत्तेजन देत. आश्रय देत. मोठमोठी बिदागी देत. त्यांची उत्तम व्यवस्था ठेवत. १८९५ साली त्यांनी अल्लादियाखाँसारख्या गायकाला आपल्या दरबारात आश्रय दिला. अल्लादियाखाँ दरबारी गायक म्हणून नेमले गेले. मुळात ते उत्तरहिंदुस्थानातील अंत्रोली घराण्याची गायकी गाणारे. महाराजांमुळे अल्लादियाखाँनी ही अंत्रोली घराण्याची ख्याल गायकी महाराष्ट्रात आणली. ते महाराजांना प्रतिपरमेश्वर मानत. महाराजांनी राज्यकारभार हाती घेतल्यानंतर अवघ्या एका वर्षातच अल्लादियाखाँची दरबारी गायक म्हणून नेमणूक केली. तेव्हा महाराजांचे वय अवघे एकवीस वर्षांचे होते. त्यावरून त्यांची समज आणि दूरदृष्टी दिसून येते. त्यावेळच्या अनेक नवोदित गायकांना अल्लादियाखाँनी आपणाला शिकवावे असे वाटत असे. त्यांची शिकवणी मिळण्यासाठी ते धडपडत. मग ते महाराजांच्या कानी लागत. पण महाराज कोणासही तसा शब्द देत नसत. महाराज प्रथम त्या नवोदित गायकाला गायला सांगत. त्याची तयारी बघत. मग ते त्याची शिफारस करीत. पण ते अल्लादियाखाँवर सक्ती करीत नसत. तो अधिकार त्यांनी अल्लादियाखाँवर सोडला होता.

अल्लादियाखाँसाहेबांनी पं. भास्करबुवा बखले, मंजीखाँ, सूरश्री केसरबाई केरकर, महाराष्ट्रकोकीळ शंकरराव सरनाईक या थोर गायक गायिकांना संगीताचे धडे दिले. हे अल्लादियाखाँ शाहू महाराजांशी अखेरपर्यंत एकनिष्ठ राहिले. काही संस्थानिकांकडून व श्रीमंतांकडून त्यांना जास्त पैशाची आमिषे येत. परंतु अल्लादियाखाँनी ती स्पष्टपणे नाकारली. त्यांनी इतर कोणाही संस्थानिकाची किंवा श्रीमंताची नोकरी केली नाही. ते अभिमानाने म्हणत, "माझा राजा मला मीठभाकर देतो ती मला पुरेशी आहे." अल्लादियाखाँच्या या उद्गारावरून त्यांना महाराजांबद्दल किती अभिमान वाटत होता हे स्पष्ट होते. त्यांनी आपली कला महाराजांच्या सेवेशी रूजू केली होती. असा रसिक राजा आणि असा घरंदाज गायककलावंत यांचा योग जुळून यावा हे महाराष्ट्राचे भाग्यच म्हणायला हवे.

# 2. मायाळू महाराज

फासेपारधी ही एक जमात आहे. फासे टाकून पक्षी पकडणे, ससे पकडणे हा यांचा धंदा. त्यावरच त्यांचा चरितार्थ चालतो. पण तेवढ्याने पोट कसे भरणार? म्हणून हे लोक चोऱ्यामाऱ्या करतात. पोटाची भूक भागविण्यासाठी त्यांना असले उद्योग करावे लागतात.

एकदा शाहूमहाराजांचा मुक्काम कटकोळास होता. तेथे त्यांना समजले की या फासेपारध्यांनी लोकांना हैराण केले आहे. चोऱ्या करून जेरीस आणले आहे. एवढेच नव्हे तर त्यांनी महाराजांच्या कँपवरही दरोडा टाकायचे ठरवले आहे. मग महाराजांनी सशस्त्र सैनिक पाठवून या फासेपारध्यांना अटक केली. मात्र त्यांना कोणताही त्रास दिला नाही. त्यांची बसल्याजागी खाण्याची व्यवस्था केली. अगदी भरपेट खाण्याची व्यवस्था केली. मग काही दिवसांनंतर त्यातील काही फासेपारध्यांना त्यांनी बोलावून घेतले. महाराजांनी त्यांना विचारले,

"का रे, तुम्ही चोऱ्यामाऱ्या का करता? तुरुंगात जायची हौस आली वाटतं?"

"महाराज, तुरुंगात जायची हौस कुणाला असंल?"

"मग चोऱ्या का करता?"

"पोटासाठी"

"अरे, एखादा चांगला कामधंदा करावा."

"आम्ही पक्षी धरतो. पण त्यावर पोट भरत नाही. दुसरा उद्योगधंदा येत नाही. त्यात आमचं नाव कानफाट्या पडलंय. कुणी जवळ उभं करीत नाही. मग कामधंदा कोण देणार?"

"मग काय दुसऱ्यांची घरं फोडायची?"

"जगण्यासाठी दुसरं काय करायचं? जर पोटापुरतं मिळालं तर ही चोरीमारी कोण करील? चोरी करणं चांगलं नाय हे कळतयं आम्हाला. पण पोटात भुकेचा आगडोंब उसळला की काय सूचत नाय. मग करतो चोऱ्या."

या प्रश्नोत्तरातून महाराजांना फासेपारध्यांच्या प्रश्नाचे मूळ सापडले. कामधंदा नाही, दुसरी कोणती कला येत नाही, कोणी जवळ करीत नाही म्हणून हे लोक चोरी करतात. यावर उपाय म्हणून महाराजांनी या सर्व फासेपारध्यांना सोनतळी कॅपवर हलवले. तेथे त्यांची राहायची व्यवस्था केली. समाजाने झिडकारलेल्या या लोकांना महाराजांनी जवळ केले. मायेची उब दिली. त्यांना सुस्थापित करण्यासाठी काय करता येईल याचा विचार सुरू केला. शाहूरायांच्या मनात उपेक्षितांबद्दल अशी अपरंपार माया होती, कणव होती.

# 3. मराठी मातीचा गुण

शाहूमहाराजांचा रायबागला मुक्काम होता तेव्हाची गोष्ट. रायबागला असताना एक इसम महाराजांकडे आला. तो नबाबाकडून एक पत्र घेऊन आला होता. तो स्वयंपाकी होता. नबाबाचे शिफारसपत्र दाखवून तो महाराजांकडे नोकरीसाठी आला होता. पत्र वाचून महाराजांनी त्याला ठेवून घेतले. एकेदिवशी त्याने महाराजांना आपल्या हातच्या स्वयंपाकाची चव चाखण्याची विनंती केली. महाराजांनी ती मान्य केली. महाराज त्याला म्हणाले,

“आम्ही आमच्या कामदाराला सांगतो. तो तुम्हाला मालमसाला, शिधा सर्व देईल. उद्या तुम्ही आमचं जेवण तयार करा.”

महाराजांची आज्ञा झाली. त्या आचाऱ्याला सर्व सामान, मटन पुरवले गेले. तो खूष झाला. आपल्या कामाला लागला. त्याने मोगली ऐश्वर्यसंपन्न पदार्थ बनवले. रात्री महाराज जेवायला बसले. बरोबर त्यांचे सरदारही होतेच. जेवताना जो तो जेवणाची स्तुती करीत होता. पण महाराज काही बोलत नव्हते. त्या पक्वान्नाचा थोडासा आस्वाद घेतल्यावर महाराज म्हणाले, “जेवण चांगलं केलंस. आम्ही तुमचं जेवण जेवलो. आता आम्ही आमचं जेवण जेवतो, त्याशिवाय पोट भरायचं न्हाई. आमचं जेवण आणा रे.” महाराजांच्या या हुकुमावर सारे पाहतच राहिले. लगेचच महाराजांच्या ताटात भाकरी, हिरव्या मिरच्याचा खर्डा, तांबड्या रश्श्याची वाटी ठेवण्यात आली. महाराज आनंदाने जेऊ लागले.

दुसऱ्या दिवशी तो आचारी महाराजांपुढे आला. त्याला महाराजांकडे आचाऱ्याची नोकरी हवी होती. म्हणून तो महाराजांना मुजरा करून त्यांच्यापुढे उभा राहिला. महाराज काय म्हणताहेत याची वाट पाहू लागला. महाराजांनी त्याला मानाचा फेटा बांधला. वर ५०० रुपये दिले. तेव्हा आचारी म्हणाला, “महाराज, आपल्या दरबारी चाकरीला राहण्यासाठी मी आलोय.”

त्यावर महाराज उत्तरले, “ते खरं, पन आमी तेवढं श्रीमंत न्हाई. नबाबाच्या घरचं स्वैपाकी तुमी. तुमाला ठेवून घेणं आम्हाला परवडायचं न्हाई. तुमी दुसऱ्या कुठल्यातरी महाराजांकडं जावा.”

निरोप घेऊन तो आचारी खाली मान घालून निघून गेला. जवळच उभे असलेले सरदार अस्वस्थ झाले. महाराजांच्या वागण्याचा त्यांना अर्थ उमगेना. म्हणून एक सरदार धीर करून म्हणाला,

“महाराज, लाखांचे पोशिंदे आपण. माणसंच नव्हे तर हजारो जनावरं आज आपल्या अन्नावर जगताहेत. मग एक आचारी आपणाला जड होता?”

या प्रश्नावर महाराज हसले. म्हणाले, “असं म्हणतोस.” आणि त्यांनी खिशातून एक कागद काढला. त्या सरदाराच्या अंगावर फेकत महाराज म्हणाले, “वाच ते. कामदारानं ही यादी दिली. काल स्वैपाक्याला काय मालमसाला लागला त्याची यादी हाय ती. केशर, पिस्ते, बदाम, चारुळं...... बघ केवढं लिवलंय ते.”

त्यावर तो सरदार म्हणाला, “परवडायचं नाही ते मग आपणाला?” त्यावर महाराज म्हणाले “परवडंल की! तसं झालं तर मग तुमी कुठं जाशीला? अरं गरिबांचा राजा हाय मी. असलं नबाबी चोचलं मला परवडायचं न्हाईत. भाकरी, खर्डा, रस्सा खाणारी आमी माणसं. आम्हास्नी त्येच बरं.”

महाराजांच्या या उत्तरावर सगळे खळखळून हसले. सर्वांना महाराजांचं बोलणं पटलं. सर्वांनी माना डोलवल्या. असा हा शाहूराया मराठी मातीचा गुण घेऊन जन्माला आला होता.

# 4. ज्योतिषाचे भविष्य

एकदा एक ज्योतिषी करवीरनगरीत आला होता. तो दक्षिणेकडचा होता. त्याने ज्योतिषशास्त्राचा चांगला अभ्यास केला होता. सर्वजण त्याला शास्त्रीबुवा म्हणत. महाराजांचे भविष्य सांगावे आणि मोठी बिदागी मिळवावी अशी त्याची इच्छा होती. म्हणून शास्त्रीबुवांनी दिवाणसाहेबांना गाठले.

आपला मनोदय सांगितला आणि दिवाणसाहेबांच्या मध्यस्थीने तो महाराजांपर्यंत पोहोचला. शास्त्रीबुवांची ओळख करून देत दिवाणसाहेब म्हणाले,

"महाराज, हे दक्षिणेचे शास्त्री. ज्योतिष चांगलं जाणतात." तेव्हा महाराज म्हणाले, "आमी आता कामासाठी निघालोय. गडबडीत आहोत. उद्या या म्हणावं."

तेवढ्यात दिवाणसाहेब पुन्हा म्हणाले,

"क्षमा असावी महाराज. पण आज ते जाणार आहेत."

"मग कशाला आले?" असं म्हणून महाराजांनी शास्त्रीबुवांकडं पाहिलं. शास्त्रीबुवांनी ती संधी साधली. पुढे होत शास्त्रीबुवा म्हणाले,

"महाराज एकदा परीक्षा पाहावी."

"असं म्हंतासा." म्हणत महाराज हसले. त्यांनी लेखणी आणि कागद मागविला. कागदाच्या तीन चिठ्या केल्या. त्या चिठ्यांवर काहीतरी लिहिलं. चिठ्या दुमडून चुरगळून त्या खाली टाकल्या. मग महाराजांनी शास्त्रीबुवांना आज्ञा केली -

"शास्त्रीबुवा, यातली एक चिठ्ठी उचला."

त्यावर शास्त्रीबुवा विचारात पडले. त्यांना त्या चिठ्ठ्यांचा अर्थ समजेना. ते महाराजांचं भविष्य सांगायला आले होते. तर महाराजच त्यांची परीक्षा घेत होते. मग महाराजांनी पुन्हा आज्ञा केली. शास्त्रीबुवांनी खाली पडलेल्या चिठ्ठीतील एक चिठ्ठी उचलली. उघडून पाहिली. तर त्यावर पाच आकडा लिहिला होता. महाराज दिवाणसाहेबांना म्हणाले,

"दिवाणसाहेब, यांना पाच रुपये देऊन पाठवून द्या."

पाच रुपयांचा आकडा ऐकून शास्त्रीबुवा नाराज झाले. कारण त्यांना मोठी बिदागी हवी होती. तेवढ्यात त्यांच्या मनात शंका आली. महाराजांनी या खाली पडलेल्या दोन्हीही चिठ्ठ्यांवर पाचचाच आकडा लिहिला असला

तर? शास्त्रीबुवांनी आपली शंका महाराजांना बोलून दाखविली. त्यावर महाराजांनी भुवया उंचावल्या. क्षणात राग आणि नाराजी त्यांच्या मुद्रेवर उमटली. महाराज म्हणाले, "असं म्हंता? त्या दुसऱ्या चिठ्ठ्या उचला आणि उघडा बघू."

शास्त्रीबुवांनी घाईघाईने त्या चिठ्ठ्या उचलल्या. उघडून पाहिल्या. तर एका चिठ्ठीवर पाचशे तर दुसरीवर पाच हजार आकडा लिहिला होता. शास्त्रीबुवांना आश्चर्य वाटले. तेवढ्यात करड्या आवाजात महाराजांची आज्ञा झाली, "दिवाणसाहेब, त्यांच्या नशिबात पाच रुपये दिसत न्हाईत. त्याला पाच फटके हाणून पाठवून द्या. आमची पारख करतो लेकाचा."

असं म्हणून महाराज त्यांच्या गाडीकडे गेले. गाडीत बसले. आता शास्त्रीबुवा घाबरले होते. तेवढ्यात महाराजांनी दिवाणसाहेबांना खूण केली. जवळ बोलावून घेतले. आणि हळूच कानात सांगितले, "गरीब आहे. त्याला मारू नका. मानानं त्याला पाठवून द्या. बडडीगर

तेवढ्यात महाराजांची गाडी सुरू झाली. शास्त्रीबुवा महाराजांना नमस्कार करण्यासाठी वाकले. तेव्हा महाराज म्हणाले, "शास्त्रीबुवा, तुमचं नशीब चांगलं दिसतंय हां." गाडी भूर्रकन् निघून गेली. दिवाणसाहेब आणि शास्त्रीबुवा आश्चर्यचकीत होऊन त्या जाणाऱ्या गाडीकडे बघतच राहिले.

# 5. दोन महापुरुष

लोकमान्य टिळकांनी मंडालेच्या तुरुंगात असताना 'गीतारहस्य' नावाचा ग्रंथ लिहिला. तो पेन्सिलीने लिहिला होता. त्याची चार बाडं तयार झाली. इंग्रज सरकारने त्या वह्या ठेवून घेतल्या. सरकारविरोधात त्यात काही लिहिलंय काय याचा त्यांना शोध घ्यायचा होता. टिळक तुरुंगातून सुटले. पण सरकार काही त्यांच्या वह्या परत करत नव्हते. त्यामुळे लोकांना सरकारविषयी संशय येऊ लागला. अखेर सरकारी अधिकाऱ्यांनी टिळकांच्या वह्या परत केल्या. त्यात त्यांना सरकार विरोधात काही सापडले नाही. लोकांनाही आनंद झाला. ग्रंथ छपाईचे काम जोरात सुरू झाले. देशभरातील विद्वानांनाही ग्रंथाबद्दल उत्सुकता होती. मात्र पुन्हा एकदा सरकारला या ग्रंथाबद्दल शंका आली. आता एकदा तपासलेला ग्रंथ पुन्हा कसा काय मागवून घ्यायचा हा प्रश्न पडला. सरकारी अधिकारी विचारात पडले. अखेर मुंबईच्या गव्हर्नरांनी हे काम शाहूमहाराजांवर सोपवले. मात्र काही आठवड्यांतच ग्रंथ परत करावा लागेल या अटीवर शाहू महाराज तयार झाले.

आणि एकेदिवशी एक घोड्याची बग्गी गायकवाड वाड्यासमोर थांबली. आत शाहूमहाराज बसले होते. त्यांनी हुजऱ्याकरवी निरोप पाठवला. टिळकांना बोलावून घेतले. टिळक घाईघाईने आले. प्रत्यक्ष शिवछत्रपतींचे वंशज आपल्या दारात आल्यामुळे त्यांना आनंद झाला. टिळकांनी शाहूमहाराजांना नमस्कार केला. महाराजांनी त्यांना गीतारहस्याची बाडं वाचायला मागितली. टिळकांना नाही म्हणणं शक्य नव्हतं. महाराजांना नकार म्हणजे शिवाजीमहाराजांचा अपमान करण्यासारखे होते आणि शिवाजीमहाराजांबद्दल तर टिळकांना प्रचंड अभिमान. कुठलेही आढेवेढे न घेता त्यांनी त्वरीत वह्या दिल्या. बग्गी निघून गेली. टिळक परत वाड्यात आले तेव्हा सहकारी म्हणाले, "आता ग्रंथ काही परत मिळत नाही." सर्वांनी नाराजी व्यक्त केली. तेव्हा टिळक म्हणाले, "नाही वह्या परत मिळाल्या तरी ग्रंथ माझ्या डोक्यात आहे. सिंहगडावर जाईन आणि ग्रंथ परत लिहून काढीन. पण मला खात्री आहे की छत्रपती आपला शब्द पाळतील."

शेवटी टिळकांचेच म्हणणे खरे ठरले. शाहूमहाराजांनी काही आठवड्यांनी त्या वह्या परत आणून दिल्या. दिला शब्द त्यांनी पाळला. ग्रंथ छपाईचे काम पुन्हा सुरू झाले. दोघेही महान! दिल्या शब्दाला जागणारे महापुरुष!

# 6. महाराज मदतीला धावले

लोकमान्य टिळकांनी व्हॅलेंटाईन चिरोल या इंग्रज अधिकाऱ्यावर अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला होता. मुंबईच्या हायकोर्टात खटल्याचे काम सुरू होते. शाहूमहाराजांचे टिळकांशी मतभेद होते. तरीही चिरोल प्रकरणी काढलेलं एक गुप्तपत्रक महाराजांनी टिळकांकडं गुप्तपणे पाठवून दिलं. या पत्रकाचा उपयोग टिळकांना होणार होता. त्यांची बाजू भक्कम होणार होती. चिरोल साहेबांना खात्यातली गुप्त माहिती पुरवावी अशा मजकुराचं ते पत्र होतं. खटल्याचे कामकाज सुरू झाले तेव्हा टिळकांचे वकील करंदीकर यांनी सरकारचे सचिव रॉबर्टसन यांना खडसावून विचारलं,

“चिरोल साहेबांना खात्यातली गुप्त माहिती पुरवावी, असं पत्रक तुम्ही काढलंत की नाही?”

“नो, नेव्हर.” (नाही, मुळीच नाही) असं रॉबर्टसन बेफिकीरीत म्हणाला.

भोजनानंतर करंदीकरांनी रॉबर्टसन्ला पुन्हा तोच प्रश्न विचारला,

“तुमच्या स्वाक्षरीचं असं पत्र निघालं की नाही?”

“छे! कधीच नाही!” रॉबर्टसन्ने उत्तर दिले.

शेवटी करंदीकरांनी रॉबर्टसन्पुढे पत्रक धरून विचारलं,

“हेच ते पत्रक आहे का पहा. यावरची सही तुमचीच आहे का ते पहा.”

पत्रक पाहून रॉबर्टसन खजील झाला. अवाक झाला. प्रत्यक्ष पुरावाच कोर्टात हजर केला होता. ते पत्रक म्हणजे सही शिक्क्याची मूळ प्रतच होती. ही मूळ प्रत महाराजांनी हेतूतः टिळकांकडे पाठवून दिली होती. या मूळ पत्रकाबद्दल एकदा प्रबोधनकार ठाकरे यांनी महाराजांना विचारलं तेव्हा ते म्हणाले,

“मग काय? ते पत्रक दाबून आम्ही टिळकांना गोत्यात आणायचं? ते देशासाठी मरतायत. तेव्हा आम्ही काय वेदोक्ताचं वैर राजकारणात धरायचं? वाद जितक्यास तितका असावा.”

# 7. मर्दानी माणसं

लोकमान्य टिळकांचे आणि शाहूमहाराजांचे वेदोक्त प्रकरणावरून मतभेद होते. टिळक ब्राह्मण, तर शाहूमहाराज ब्राह्मणेतर मराठे. परंतु तरीही टिळकांच्यातील लढवय्येपणा महाराजांना भावला होता. इंग्रजांविरुद्ध ते ज्या हिंमतीने लढत होते ती हिंमत त्यांना मनोमन भावली होती. टिळकांचा केसरी इंग्रजांविरुद्ध आग ओकीत होता. देशाच्या स्वातंत्र्यासाठी टिळक जीवाचे रान करीत होते. सर्वस्व पणाला लावून लढत होते. त्यांच्यातील हा लढण्याचा गुण, देशभक्ती, सर्वस्व झोकून देण्याची तयारी शाहूमहाराजांना मनापासून पसंत होती. वरून दोघांचे मतभेद आहेत हे सर्वजण जाणत होते. वृत्तपत्रांतून तसे छापूनही येत होते. पण आतून ते एकमेकांवर मनापासून प्रेम करीत होते.

लोकमान्य टिळकांच्या अखेरच्या काळातील एक प्रसंग. टिळक मुंबईला सरदारगृहात आजारी होते. इकडे कोल्हापुरात शाहूमहाराज अस्वस्थ होते. त्यांची मुंबईला ‘पन्हाळा लॉज’ नावाची वास्तू होती. तेथे त्यांनी एक माणूस नेमला होता. त्याच्यावर एक जबाबदारी सोपवली होती. ती जबाबदारी म्हणजे दर तीन तासांनी टिळकांच्या प्रकृतीची बातमी कळवायची. त्या काळात महाराजांनी आपले इतर कार्यक्रमही रद्द केले होते. असेच दुपारचे अकरा वाजले होते. महाराज जेवायला बसले. पहिला घास तोंडात घालणार तोच लोकमान्यांच्या मृत्यूची बातमी आली. महाराज ताटावरून उठले. लगेच दिवाणसाहेबांना निरोप गेला- ‘संस्थानातल्या सर्व कचेऱ्या बंद करा.’ निरोपाप्रमाणे कचेऱ्या बंद झाल्या. दिवाणसाहेब महाराजांना भेटायला आले, तेव्हा ते म्हणाले, “मास्तर, मर्दानी माणूस गेला! आता कोणाशी आपण लढा देणार? त्याच्यामागे सगळा पोरकटांचा बाजार!”

खरं तर दोन्हीही मर्दानी माणसं! एकमेकांना जाणून असणारी. मर्दच मर्दाला जाणतो, ओचूक दुरुस्त झाली

लोकमान्य टिळकांना तेल्या तांबोळ्याचे पुढारी म्हणत. इंग्रज साम्राज्याविरुद्ध त्यांनी मोठा लढा दिला. १ ऑगस्ट १९२० रोजी त्यांचे मुंबई येथे निधन झाले. सारा देश शोकसागरात बुडाला. शाहूमहाराजांनाही अतीव दुःख झाले. म्हणून त्यांनी आपल्या एका सरदाराला बोलावले. त्याच्याकडे नवीन वस्त्रे देऊन त्याला पुण्याला धाडले. टिळकांच्या मृत्यूच्या तेराव्या दिवशी सरदार नवी वस्त्रे घेऊन टिळकांच्या वाड्यात आले. घरच्या मंडळींना ती वस्त्रे दिली. कोल्हापूरच्या शाहूमहाराजांनी ही वस्त्रे दिलीत हेही सांगितले. ती वस्त्रे पाहून लोकांना आश्चर्य वाटले. वस्त्रे देऊन सरदार पुन्हा कोल्हापूरला आले.

पुढे टिळकांचे चरित्र लिहिले गेले. त्यात वरील प्रसंगाचा उल्लेख करण्यात आला आहे. त्या चरित्रात असे लिहिले आहे की, ‘छत्रपती शाहू महाराज आणि टिळक यांचे आयुष्यभर चाललेले वैर टिळकांच्या मृत्यूनंतरही थांबले नाही. टिळकांच्या दिवसाचे दिवशी नवी वस्त्रे पाठवून शाहू महाराजांनी ते वैर चालू ठेवले.’ शाहू

महाराजांनी पाठविलेल्या नवीन वस्त्रांचा असा अर्थ लावण्यात आला. जेव्हा शाहू महाराजांच्या लक्षात ही गोष्ट आणून देण्यात आली तेव्हा त्यांना अतीव दुःख झाले. ते म्हणाले, "ते बामन. त्यास्नी आमचा रिवाज कळायचा न्हाई. त्यास्नी कळवा, छत्रपती कधी परक्याचं सुतक पाळत न्हाईत. पण जवळच्या आप्ताचं पाळतो. ज्याचं सुतक पाळतो त्याच्या घरच्या मानसास्नी नवे कपडे पाठवण्याची रीत हाय आमची. गेला मानूस गेला न्हाई... त्याच्या जागी आमी हाय... पाठवलेले नवे कपडे घाला आणि दुःख विसरून जावा, असं आमी सांगतो. कळवा त्यास्नी."

शाहू महाराजांचे मन असे मोठे होते. त्यात विशालता होती. मोठ्या मनाच्या माणसाने पाठवलेले ते मायेचं वस्त्र होतं. पांघरूण होतं. पण त्याचा विपरीत अर्थ लावण्यात आला. म्हणून महाराजांना स्पष्टीकरण द्यावं लागलं. त्यातून राजघराण्याची रीतही लोकांना कळली. मग आक्षेप घेणारांची मनं निवळली. मनं स्वच्छ झाली. महाराजांचा दिलदारपणा लोकांनां कळला आणि टिळकचरित्र ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीत ती चूक दुरुस्त करण्यात आली.

# 8. शिक्षणप्रेमी शाहूमहाराज

शाहूमहाराजांना शिक्षणाची फार आवड. आपल्या संस्थानातील सर्वांना शिक्षण मिळावे म्हणून ते सतत धडपड करीत. स्त्रिया, दलित, बहुजन या सर्वांनाच शिक्षण मिळावे असे त्यांना वाटे. म्हणून त्यांनी ग्रामीण भागात शाळांची संख्या वाढवली. पुढे विद्यार्थ्यांची संख्याही वाढली. पण कोल्हापुरात येऊन उच्चशिक्षण घेताना या मुलांना फार कष्ट पडत. तेथे राहण्याजेवणाची फार गैरसोय होई. एकदा महाराजांना समजले की मराठा समाजातील पांडुरंग चिमणाजी पाटील हा मुलगा मॅट्रिक पास झालाय. महाराजांनी सेवक पाठवून त्याला बोलावून घेतले. त्याची विचारपूस केली. महाराज त्याला म्हणाले, "कोणत्या खाणावळीत जेवण घेता? तिथं काय द्यावं लागतं?"

त्यावर पाटील म्हणाले, "शहरात फक्त ब्राह्मणांच्या खाणावळी आहेत. त्यांना दरमहा पाच रुपये द्यावे लागतात. शिवाय जेवणानंतर पत्रावळी उचलाव्या लागतात. शेणगोळाही फिरवावा लागतो. ब्राह्मणांना ताटं तर इतरांना पत्रावळी असतात. म्हणून मग ब्राह्मणाच्या खाणावळीचा नाद सोडून एका मराठ्याकडे साडेतीन रुपये देऊन जेवणाची सोय केलीय."

"अभ्यासासाठी जागा होती?" महाराजांनी पुढचा प्रश्न केला.

"मराठ्याचं घर छोटं होतं. म्हणून मग आम्ही पाच सात जणांनी तालीम मास्तरांना विचारून तालमीत अभ्यासाची आणि झोपण्याची सोय करून घेतली." पाटील म्हणाले.

"आता पुढं काय करणार?"

"वडिलांबरोबर घरची शेती करणार."

"आम्ही खर्च केला तर शिकाल काय?"

"वडिलांना विचारलं पाहिजे."

"बरं! चार दिवस इथंच रहा. नंतर वडिलांना विचारून या." शाहू महाराज म्हणाले. त्यानंतर पाटील पन्हाळ्यावर वस्तीला आले.

या चर्चेतून महाराजांना विद्यार्थ्यांच्या राहण्याची अडचण समजली. मग त्यांनी कोल्हापुरात अनेक जातींची वेगवेगळी वसतीगृहे स्थापन केली. त्यात मराठा, लिंगायत, जैन, सोनार, मुसलमान, महार वगैरे बहुतेक जातींची वसतीगृहे काढली. अशा प्रकारची वसतीगृहे त्या काळात महाराष्ट्रातल्या कोणत्याही शहरात नव्हती. ही खास महाराजांची दृष्टी. त्यामुळे अनेक जातीधर्मांच्या गरीब विद्यार्थ्यांची सोय झाली. त्यांना उच्च शिक्षण घेता आले.

या शिक्षणामुळे त्यांना जीवनाचा मार्ग सापडला. दिशा मिळाली. त्यांच्या आयुष्यात ज्ञानाचा प्रकाश पडला. याचे सर्व श्रेय शाहूरायांनाच जाते.

# 9. ‘नाहीरे’ वाल्यांची जाणीव

शाहूमहाराज सोनतळ कॅम्पात होते, तेव्हाची गोष्ट। महाराजांबरोबर एक शिकलेले गृहस्थ होते. दोघांचे बोलणे चालले होते. बोलता बोलता ते गृहस्थ महाराजांना म्हणाले,

“महाराज, एक प्रश्न विचारू का?”

“एकच का, हवे तेवढे विचारा.”

“एक प्रश्न बरेच दिवस मनात खदखदतो आहे.”

“मग कशाला खदखदत ठेवला? विचारून मोकळं व्हायचं ना.”

तेव्हा गंभीर चेहऱ्याने ते गृहस्थ म्हणाले, “आपल्या संस्थानाच्या खजिन्यात जमा होणारा पैसा सर्व जनतेचा असतो. अशा परिस्थितीत तो पैसा सर्व लोकांसाठी समान प्रमाणात खर्च व्हायला पाहिजे. पण तुम्ही विशिष्ट जातीजमातींसाठी तो जास्त खर्च करता हे योग्य आहे का?”

यावर महाराज गंभीर झाले. बराच वेळ गप्प बसले. तेव्हा त्या गृहस्थांना असे वाटले की आपले म्हणणे महाराजांना पटले आहे. गप्पा मारत मारत दोघेही घोड्यांच्या तबेल्याजवळ आले. तेथे काही अशक्त घोडे होते. काही उमदे घोडे होते, तर काही आजारी घोडे होते. महाराजांनी घोड्यांची पाहणी केली. तिथे उभ्या असलेल्या मोतद्वाराने महाराजांना लवून मुजरा केला. त्या मुजऱ्याचा स्वीकार करून महाराज त्याला म्हणाले,

“अरे, घोड्यांना चंदी टाकली का?”

“नाही, पण आता टाकणार आहे.”

“मग असं कर, आज चंदी एकत्र टाक आणि ती खाण्यासाठी सर्व घोड्यांना एकदमच सोड.”

महाराजांच्या आज्ञेनुसार मोतद्दाराने चंदी एकत्र टाकली आणि सर्व घोड्यांना एकदमच सोडून दिले. सर्व घोडे दौडतच चंदीजवळ आले. त्यांची गर्दी उसळली. सशक्त घोड्यांनी अशक्त व आजारी घोड्यांना दूर लोटले. त्यामुळे त्यांना एक कणही मिळाला नाही. ते उपाशीच राहिले. सशक्त घोड्यांनी आपल्या शक्तीच्या जोरावर चंदी फस्त केली. दुबळे घोडे चंदीपासून दूरच राहिले. हा सर्व प्रकार ते गृहस्थ पहात होते. त्यांना आश्चर्य वाटले. त्यांनी एकाएकी महाराजांना प्रश्न केला. “महाराज, सर्व घोड्यांना चंदी एकत्र टाकायला का सांगितलीत?”

“तुमच्या मघाच्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी.”

“यातून माझ्या प्रश्नाचं उत्तर कसं काय मिळतं?”

त्यावर धीरगंभीर होत महाराज म्हणाले, “चंदीवर सर्व घोड्यांचा समान हक्क असताना प्रत्यक्ष कुणाला चंदी मिळाली?”

“सशक्त घोड्यांना.”

“अशक्त घोड्यांना चंदी का मिळाली नाही?”

“ती मागेच राहिल्यामुळे.”

“मग अशक्त घोड्यांना चंदी मिळण्यासाठी काय केले पाहिजे?”

“त्यांच्यासाठी चंदी बाजूला काढून त्यांच्यापुढे स्वतंत्रपणे ठेवली पाहिजे.” त्या गृहस्थाच्या उत्तरावर महाराज म्हणाले, “मागास जातीजमातींना आजवर अवहेलने खेरीज काहीच मिळू शकले नाही. म्हणून त्यांच्या विकासासाठी खास तरतूद केली पाहिजे. ही गोष्ट न्याय्यच होईल, नाही का?”

महाराजांच्या या प्रश्नावर ते गृहस्थ खजिल झाले. त्यांच्या प्रश्नाचे उत्तर त्यांना मिळाले होते. तेही प्रात्यक्षिकांसह महाराजांच्या म्हणण्याला दुजोरा देत ते गृहस्थ म्हणाले, “महाराज, माझ्या प्रश्नाचं उत्तर मला मिळालं आहे. दुर्बल घटकांना सहाय्य करणं योग्यच आहे. नव्हे ते न्याय्यच आहे.” त्यांच्या या उत्तरावर महाराज दिलखुलास हसले आणि प्रसन्न मुद्रेने पुढे चालू लागले.

# 10. गंगारामचं ‘सत्यसुधारक’ हॉटेल

कोल्हापुरातल्या बावडा बंगल्याच्या आवारात सर्व नोकरचाकरांची कामं सुरू होती. त्यात गंगाराम कांबळे हे सरकारी पागेतील मोतद्दारही होते. तेथील काही उच्चभ्रु समाजातील कर्मचाऱ्यांनी गंगारामला मारहान केली. कारण होतं, त्यानं पाणी पिण्यासाठी उच्चवर्णीय समाजासाठी असलेल्या हौदाला स्पर्श केल्याचं.

खरं तरं १९१९ ला शाहू महाराजांनी सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता न पाळण्याचा जाहीर हुकूम काढला होता. महाराजांचं या संदर्भातलं धोरण माहीत असूनही त्यांच्या संस्थानात ही घटना घडली होती. हे सर्व घडत असताना महाराज काही कामानिमित्त दिल्लीला गेले होते.

दिल्लीहून परत येताच सर्व प्रकार गंगारामने महाराजांना सांगितला आणि गंगाराम समोर त्या कर्मचाऱ्यांना शिक्षा झाली. शाहु महाराजांनी गंगारामला जवळ घऊन म्हणाले “जा, गंगाराम तुला नोकरी माफ केली. तू कोणताही स्वतंत्र धंदा कर. लागेल ती मदत माझ्याकडे माग.”

पुढे काही दिवसांतच गंगाराम कांबळे यांनी शाहू महाराजांच्या प्रोत्साहनानं कोल्हापुरातील भाऊसिंगजी रोडवर ‘सत्यसुधारक’ हॉटेल सुरू केलं.

गंगाराम यांना हॉटेल काढून देण्याचाच फक्त त्यांनी निर्णय घेतला नाही. एका अस्पृश्य समाजातील माणसाचे हॉटेल चालावे त्यांनी एक नामी शक्कल लढवली. इतिहासात आजही ती सुवर्णक्षरांनी कोरली गेली आहे. सकाळच्या वेळेला शाहू महाराज घोडागाडीतून फेरफटका मारत असत. यावेळी शाहू महाराज गंगाराम कांबळे यांच्या हॉटेलसमोर थांबून भारदस्त आवाजात घोडागाडीमध्ये बसलेल्या सर्वांना गंगाराम यांना चहा आणायला सांगत. स्वत: शाहू महाराज गंगारामच्या हातचा चहा घेतात म्हटल्यावर घोडागाडीतील सर्वांना चहा पिणे भाग पडे.

शाहू महाराज एवढ्यावरच थांबले नाहीत त्यांनी यानिमित्ताने समाजातील जातीपातीला मूठमाती मिळावी यासाठी यानिमित्ताने प्रयत्न केले. शाहू महाराजांची सही कुणाला हवी असेल तर गंगाराम कांबळे यांच्या सत्यसुधारक हॉटेलमध्येच या म्हणून सांगितले जात असे. यामुळे गंगाराम यांच्या हॉटेलवर नागरिकांची मोठी गर्दी होऊ लागली. यावेळी शाहू महाराज येणार्या प्रत्येकाला गंगाराम कांबळे यांच्या हातचा चहा पाजून मगच सही करत.

शाहू महाराजांनी गंगाराम कांबळे यांच्या जीवनात क्रांती घडवून आणली. हेच गंगाराम कांबळे पुढे अस्पृश्य समाजाचे पुढारी बनले. अस्पश्योध्दाराच्या काळात महाराजांचे ते कार्यकर्ते झाले. शाहू महाराजांच्या

निधनानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्पृश्य मुक्तीच्या लढ्यात कोल्हापूर संस्थानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निष्ठवान कार्यकर्ते म्हणून कार्यरत राहिले.